## निशाणी क्रमांक ३० वर आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी प्रस्तुत कामी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन तसेच विना म्हणणे/कैफियतचा आदेश रद्द होऊन मिळण्याकरीता केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादींनी म्हणणे दाखल करुन आक्षेप दर्शविला आहे.

३. प्रतिवादींच्या मते, प्रतिवादी यांना वेळेत दाव्याचे अनुषंगाने आवश्यक ती माहिती व कागदपत्रे मिळालेली नसल्याने तसेच कोरोना महामारीमुळे दाव्याची माहिती वकीलांना देश शक्य नसल्याने तसेच प्रतिवादी हे स्वतः कोरोनामुळे हॉस्पीटलमध्ये ॲडमिट होते. त्यामुळे मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यामुळे मुदतीत कैफियत दाखल करता आले नाही . वाद मिळकतीमध्ये प्रतिवादींचे मौलिक हक्क गुंतले असल्याने न्यायाच्या दृष्टीने त्यांची कैफियत प्रस्तुत कामी दाखल करुन घेणे आवश्यक आहे.

४. वादींच्या मते, प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज खोटा असून अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण नमुद नाही. प्रतिवादींना संधी दिलेली असतानाही म्हणणे व कैफियत देण्यास मुदतीचे अर्ज दाखल केले नाही तसेच अर्जात किती दिवसांचा विलंब झाला आहे, याचे कारण नमूद नाही तसेच विलंब माफीचा अर्जही दिलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा. जरी अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००० /– इतके कॉस्ट करण्यात यावी ही विनंती केली.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला असून , प्रस्तुत दाव्यामध्ये स्थावर मालमत्तेचा समावेश असून, स्थावर मालमत्ते अनुषंगानेच दाद मागितली आहे . प्रस्तुत प्रकरणी दि. २५/०९/२०१८ रोजी प्रतिवादींना समन्स बजावणी झाल्याचे दिसून येते . तसेच

प्रतिवादी दि. २६/०९/२०१८ रोजी हजर झाल्याचे दिसून येते. त्या नंतरचा काळ पाहता, कोविड–१९ च्या प्रतिबंधात्मक परिस्थितीमुळे न्यायालयीन कामकाज मर्यादीत स्वरुपात सुरु होते ही बाब नाकारता येणार नाही . सबब एकूणच परिस्थिती पाहता व प्रस्तुत दाव्यातील स्थावर मिळकतीचा समावेश पाहता, न्यायाचे कारणास्तव प्रस्तुत प्रतिवादींना संधी देणे आवश्यक वाटते . प्रस्तुत प्रतिवादींना न्यायाचे कारणास्तवसंधी दिली नाही तर न्यायालयीन कामकाजाचे बाहुल्य वाढणार आहे व प्रतिवादींच्या न्याय हक्कावर गदा येणार आहे. सबब, न्यायाचे तत्व विचारात घेता, प्रस्तुत दाव्याचा निकाल गुणदोषावर करण्यासाठी प्रस्तुत प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची संधी देणे आवश्यक वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज प्रत्येकी रक्कम रु. ३००/– खर्चाने मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम वादींना पुढील तारखेस देण्याची आहे.

३. प्रतिवादींनी पुढील तारखेस खर्चाची रक्कम देण्यास कसूर केले तर प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

sd/–
( ए.एस. सोनवलकर )
दिनांकः–३१/०७/२०२३. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | A.B. Sandrok |
| Court | - | 2nd Jt. CJJD & JMFC, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 31/07/2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 31/07/2023 |
| Judgment/Order uploaded on | - | 31/07/2023 |